## कार्यालय पोलीस उप अधिक्षक,लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,जालना

टोल फ्रि क्रमांक १०६४

कार्यालय दुरध्वनी क्र. :- ०२४८२-२२०२५२

:: प्रेस नोट :: दिनांक :- २२.०५.२०१९

**नगर परीषद,जालना जि.जालना येथील कार्यालयीन अधिक्षक,आस्थपना विभाग श्री.जोगस व अग्नीशमन अधिकारी श्री. गंगासागरे यांना 5,500/- रुपयाची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालनाच्या पथकाने पकडले**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | १.श्री.भाऊसाहेब सदाशिव जोगस वय ५२ वर्ष, व्यवसाय-नौकरी, कार्यालयीन अधिक्षक,आस्थपना विभाग नगर परीषद,जालना वर्ग-३, ह.मु. बिडपायस,बाळापुर फाटयाजवळ ,सर्वे नं.४१ मुकुंदनगर मारोती मंदीराजवळ ,औरंगाबाद, मु.रा.नारळा मारोती मंदीराजवळ पैठण ता.पैठण जि.जालना.<br>२. श्री. सुरेश गंगाराम गंगासागरे वय ५७ वर्ष, व्यवसाय-नौकरी,अग्नीशमन अधिकारी अतिक्रमण निर्मूलन अधिकारी वर्ग ३ नगर परीषद जालना. ह.मु.फायर स्टेशन कॉलनी,राष्ट्रीय हिंदी विद्यालय समोर नवा जालना., मु.रा.विवेकानंद हॉस्पीटल समोर, रहीमान गंज ,जालना. |
| २ | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दि.२२.०५.२०१९ रोजी नगर परीषद जालना येथे. |
| ३ | लाचेची रक्कम | :- | ५,५००/- रुपये |
| ४ | सापळा अधिकारी | :- | श्री.ए.व्ही.काशिद, पोलीस निरीक्षक , लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना. |

याबाबत थोडक्यात हकीगत अशी आहे की, तक्रारदार हे फायर सेप्टी सेल्स ॲण्ड सर्वीस चे काम करतात,तक्रारदार यांनी जालना शहरातील हॉस्पीटल व हॉटेलचे अग्नीशमन यंत्र बसवलेले आहे. सदर चे अग्नीशमन यंत्र बसवले म्हणून व त्यामध्ये कोणतीही प्रकारची त्रुटी नाही. म्हणून नगरपरीषदेचे अग्नीशामक अधिकारी यांची नाहरकत प्रमाणपत्राची आवश्यकता असते. सदरचे नाहरकत प्रमाणपत्र मिळणेकामी अग्नीशामन अधिकारी श्री.गंगासागरे यांना दि.२१/५/२०१९ रोजी भेट घेवून नाहरकत प्रमाणपत्र देण्याची विनंती केली असता अग्नीशामन अधिकारी श्री.गंगासागरे यांनी माझे व कार्यालयीन अधिक्षक श्री.जोगस यांचे १५०००/-रुपये लागतील असे सांगितले तेव्हा तक्रारदाराची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कर्यालय जालना येथे तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दि.२१/५/२०१९ रोजी अग्नीशामन अधिकारी श्री.गंगासागरे व कार्यालयीन अधिक्षक श्री.जोगस यांची पंचासमक्ष लाचेची मागणीची पडताळणी केली असता, वरील दोन्ही आरोपींनी तडजोडीअंती ५५००/-रुपयाची लाचेची मागणी केली.

त्यावरुन लाचेचा सापळा दि.२२/५/२०१९ रोजी नगरपरीषद कार्यालय जालना येथे सापळा आयोजीत केला असता अग्नीशामक अधिकारी श्री.गंगासागरे यांचे सांगणेवरुन कार्यालयीन अधिक्षक श्री.जोगस यांनी पंचा समक्ष ५,५००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारली असतांना त्यांना लाचेच्या रक्कमेसह पकडण्यात आले. वरील आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्या बाबतची पुढील कार्यवाही चालू आहे.

**तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कडुन अवाहन करण्यात येते की कोणी लोक सेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास ०२४८२-२२०२५२, तसेच टोल फ्री क्रमांक १०६४ वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं.७९७२७२६१०१ पोलीस निरीक्षक मो.नं. ९८२३१४२६३२, ९७६७७४७७७४ वर संपर्क करावा.**

(श्री.रविंद्र डी.निकाळजे)
पोलीस उप अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना